१८ जानेवारी २०१२

# व्यावसायिक यशासाठी अंतर्मुख होण्याची गरज

मराठी भाषेत दरसाल शंभरपेक्षा अधिक चित्रपट तयार होतात. पण अनेकांना व्यावसायिक गणित नीट जमवता येत नाही. त्यासाठीच चित्रपटाची कथा, प्रसिद्धी, वितरण या संदर्भात अंतर्मुख होऊन विचार करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन निर्माते, वितरक, चित्रपटगृहचालक आदींनी परिसंवादात केली.

वितरक संजय छाब्रिया म्हणाले की, चित्रपटगृहात गुंतवलेला पैसा वसूल होणे आवश्यक आहे. पण, चित्रपट लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी गंभीरपणे प्रयत्न होत नाहीत.

इम्पाचे प्रतिनिधी विकास पाटील म्हणाले की, तयार होणाऱ्या चित्रपटांपैकी नव्वद टक्के चित्रपट तोट्यात जातात. बरेच चित्रपट फक्त अनुदानासाठी काढले जातात.

चित्रपटगृहचालक दिपक कुदळे यांनी सांगितले की, चित्रपटाच्या विक्रीवर अनेकांचे भवितव्य अवलंबून असते. एकपडदा चित्रपटगृहे हे मराठीसाठी वरदान आहेत.

सिटी प्राईडचे संचालक प्रकाश चाफळकर म्हणाले की, श्वास चित्रपटाने मराठीने कूस बदलली. आम्ही ११० शोचे बंधन असूनही दहापट अधिक मराठी शोज दाखवतो. मराठी चित्रपटाची भरपूर चर्चा झाल्यावरच लोक ते बघायला येतात याकडे लक्ष देण्यात यावे.

देऊळचे निर्माते अभिजीत घोलप म्हणाले की, हिंदी चित्रपटाबाबत जसे आधी कुतुहल निर्माण केले जाते तसे मराठीत होत नाही. तसे होण्याची गरज आहे.

प्रभात चित्रपटगृहाचे विव्क दामले म्हणाले की, मराठी निर्मात्यांनी एकमेकांचे वैरी न होता मित्र व्हावे.

यावेळी प्रेक्षकांच्या प्रश्नांना उपस्थितांनी उत्तरे दिली. मराठी चित्रपट महामंडळाच्या वतीने रामदास फुटाणे यांनी उपस्थितांचा सत्कार केला.ज्येष्ठ दिग्दर्शक राज दत्त यांच्यासह अनेक नामवंत परिसंवादात उपस्थित होते.

आपला स्नेहांकित,

प्रवीण प्र. वाळिंबे

प्रवीण प्र. वाळिंबे
मीडिया को-ऑर्डिनेटर
९८२२४५४२३४ / ९४०५०३५४५८

Pune Marathon Bhavan, Near Mitra Mandal Colony, Opp. Parvati P. O.,
Pune - 411009, India. Tel: +91 20 24424545, Fax: +91 20 24428788,
Email: piff.india@gmail.com Website: www.puneinternationalfilmfestival.com
R. No. : F - 24914 / Pune S/R. No. : MAH / 1325 / 2009 / Pune